वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि.२ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## गेवराईमध्ये पंडित-पवार आमने सामने, तुफान राडा, दगडफेक पोलिसांचा लाठीचार्ज

## बीड शहरात शाहु नगर भागात तुफान हाणामारी, दोन जणांचे डोके फुटले, पोलिसांचा लाठीचार्ज

# शहरात शांततेत मतदान पूर्ण,सर्वच मतदान केंद्रावर बोगस मतदारांची संख्या वाढली

जिल्हाधिकाऱ्यांसह जिल्हा पोलीस अधिक्षकांचे फरमान असतांनाही अनेक मतदान कार्ड आणि आधार कार्ड बोगस,बीडमधील एका मारवाडीच्या कॉलेजमध्ये रात्री तुफान पैसे वाटप झाल्याची शहरात जोरदार चर्चा

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## २१ तारखेला कोण होईल बीडचा नगराध्यक्ष ?

# घड्याळ V/S कमळामध्ये जोरदार टक्कर

### शहरात अनेक मतदान केंद्रावर क्रॉस वोटींगचे प्रमाण वाढले, आता २१ तारखेला निकाल तो पर्यंत सर्वच उमेदवारांचा बीपी वाढलेला असेल






### बलभिम महाविद्यालयाच्या बुथवर तुफान हाणामारी, एका उमेदवारांनी दुसऱ्या उमेदवाराच्या कानशिलात लगावली, माजलगावात तुतारी वाजणार

## वार्ड क्र. १० मध्ये पृथ्वीराज-शिवराजमध्ये मारामारी

### बाळराजे कृष्णाईवर धावले, जयसिंह पंडित पवारांच्या निवासस्थानाबाहेर











बलभिम महाविद्यालय आणि मिलिया महाविद्यालय मुलींच्या शाळेत बोगस मतदारांचे प्रकरण वाढले

### एका वृध्द महिलेचे मतदान कोणीतरी करून गेल्याने राग अनावर झालेल्या त्या वृध्द मतदारानी एका उमेदवारांच्या कानशिलात वाजविली

बीड, (दिव्य न्युज):- पंडित विरुद्ध पवार ही राजकारणाच्या आखाड्यातली लढाई आज मतदानादिवशी मुद्यावरून गुद्यावर आली. वार्ड क्र. १० मध्ये पवार-पंडित यांचे पुत्र पृथ्वीराज पंडित आणि शिवराज पवार एकमेकांना भिडले. त्यांच्यात चांगलीच त्याठिकाणी मारामारी झाली. पाठोपाठ बाळराजे पवार हे कृष्णाईवर जाऊन धडकले. तेथे शाब्दीक बाचाबाची झाल्यानंतर जयसिंह पंडित आणि त्यांचे पुत्र पृथ्वीराज पंडित हे पवारांच्या निवासस्थानाबाहेर जात तेथे दगडफेक केली. या दगडफेकीत एका गाडीचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. आज सकाळी गेवराई शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत ते वातावरण निवळले. अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचीन पांडकर हे मोठ्या पोलीस बंदोबस्तासह सध्या गेवराईत तळ ठोकून आहेत.

याबाबत अधिक असे की, गेवराई नगरपालिकेसाठी आज सकाळी मतदानाला सुरुवात झाली. येथे बाळराजे पवार विरुद्ध आ. विजयसिंह पंडित अशी राजकीय लढाई सुरु आहे. प्रचारात पवार-पंडित कुटुंबियांनी एकमेकांवर प्रचंड आरोप-प्रत्यारोप केले. राजकारणाच्या आखाड्यातली लढाई अखेर आज मतदानादिवशी मुद्यावरून गुद्यावर आली. सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास शहरातल्या वार्ड क्र. १० मध्ये पृथ्वीराज पंडित आणि शिवराज पवार हे एकमेकांना भिडले. त्याठिकाणी प्रचंड राडा सुरु झाला. पोलिसांनी हस्तक्षेप केला. त्या वेळी घटनास्थळी बाळराजे पवार आणि माजी आ. अमरसिंह पंडित आले. दोघांनी आपआपल्या कार्यकर्त्यांना समजावून सांगत आणि समजावून घेत दोघेही तेथून निघून गेले.मात्र काही वेळानंतर बाळराजे पवार हे पंडितांच्या निवासस्थानी कृष्णाईच्या बाहेर उभा राहीले. तिथे शाब्दीक वाद झाला. बाळराजे तेथून परतल्यानंतर काही वेळाने जयसिंह पंडित-पृथ्वीराज पंडित हे पवारांच्या निवासस्थानाकडे गेले. तिथे दगडफेक झाली. या दगडफेकीत एका गाडीचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. पोलिसांनी आणि दंगलनियंत्रण पथकाने शहरातली अशांतता आटोक्यात आणली. दुपारी एक वाजता सर्व मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत सुरु होती.



**बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यातल्या बीड, परळी, अंबाजोगाई, धारूर, माजलगाव, गेवराई नगरपालिकांसाठी आज सकाळपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. मतदारांत प्रचंड उत्साह दिसत असून कडाक्याच्या थंडीत मतदानासाठी मतदान केंद्रांमध्ये बहुगर्दी पहावयास मिळत आहे. दुपारी एक वाजेपर्यंत परळीत अंदाजे ३१ टक्के, अंबाजोगाईत ३२.७६, गेवराईत ४१.५०, किल्ले धारूरमध्ये २९.३५ तर माजलगावमध्ये ३४.३ ९ टक्के मतदान झाले होते. काही ठिकाणी तांत्रिक बिघाडामुळे मतदानाला अडथळे आले. तर काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये शाब्दीक बाचाबाची पहावयास मिळाली. सर्व शहरांमध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्तात मतदान प्रक्रिया सुरु आहे.**

बीड जिल्ह्यातल्या सहा नगरपालिकांसाठी प्रचाराची रणधुमाळी काल रात्री संपल्यानंतर आज सकाळी प्रत्यक्षात मतदानाला सुरुवात झाली. बीडमध्ये भाजपा, अजितदादांची राष्ट्रवादी, शरद पवारांची राष्ट्रवादी, एमआयएम, काँग्रेस, संचित हे अध्यक्षपदाचे उमेदवार निवडणूक रिंगणात उभे आहेत. प्रामुख्याने भाजपा, अजितपचारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी यांच्यात लढत पहावयास मिळत आहे. गेवराईमध्ये भाजण विरुद्ध अजितदादांची राष्ट्रबादी तर परळीत मुंडे बंधू-भगिनींना शरद पवारांच्या राष्ट्रवादीने आव्हान दिले आहे. इकडे माजलगाबमध्ये आ. प्रकाश सोळंकेंना भाजपासह शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी सामना करावा लागत आहे. आज संध्याकाळी या सर्व मातब्बर नेत्यांच्या उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार आहे. सकाळी कडाक्याच्या थंडीत मतदारांनी काही ठिकाणी संथगतीने तर काही ठिकाणी उत्साहात मतदान केले. दुपारी एकपर्यंत परळीत अंदाजे ३१ टक्के, अंबाजोगाईत ३२.७६, गेवराईत ३५.०६, किल्ले धारूरमध्ये २९.३५ तर माजलगावमध्ये ३४.३९ टक्के मतदान झाले होते. बीडमध्ये मताचा टक्का हा ३० टक्क्यांच्या पुढे गेल्याचे न्यायालयाच्या निकालामुळे आता मतमोजणी पुढे ढकलली आहे.











१| बीड: आज बीड जिल्ह्यात सहा नगर परिषदांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. त्याची तयारी जिल्हा प्रशासनाकडून जोरदार सुरू असून सोमवारी सर्व बुथवर यंत्रणा उभी करण्यात आली. निवडणूक साहित्य घेवून जाताना कर्मचारी दिसत आहेत.

2| सहा नगर परिषदांसाठी ४३४ बुथांवर मतदान प्रकिया पार पडणार आहे. यात बीडमध्ये सर्वाधिक १७९ बुथ संख्या आहे. सहा नगराध्यक्ष आणि १८२ नगरसेवकांसाठी प्रक्रीया राबविण्यात येत आहे. यात नगराध्यक्ष पदासाठी ५० तर नगरसेवक पदासाठी ८५४ उमेदवार रिंगणात आहेत.

3| बीड जिल्ह्यातील बीड : १७९, परळी : ८८,अंबाजोगाई : ६९, माजलगाव : ४५, गेवराई : ३१, धारूर : २२, एकूण : ४३४ बुथ संख्या आहे. या सर्व बुथवर सोमवारी सांयकाळीच कर्मचारी दाखल झाले आहेत. बुथवर पोहचण्यासाठी दिवसभर कर्मचारी धावपथ करताना दिसले.

3| जिल्ह्यातील नगर पालिकेमध्ये बीड : १८०६५८, परळी : ७७४७०, धारुर : १८९१२, माजलगाव : ४०९८४, गेवराई : ३०१६१, अंबाजोगाई: ६५६६१, एकूण : ४१३८४६ असे मतदान आहे.




























# उद्याची मतमोजणी रद्द;२१ डिसेंबरला होणार निकाल जाहिर

मुंबई , (दिव्य न्युज):- आज राज्यभरात होत असलेल्या राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. काही नगरपरिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील जवळपास २० नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया पुढे ढकलली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला होणार होती. त्यामुळे सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. आज मतदान झालं तरी त्याचे निकाल २१ तारखेला जाहीर करा. तसेच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० तारखेला निवडणूक संपल्यानंतर अर्धा तासाने जाहीर करता येतील. तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असे न्यायालयाने सांगितलं आहे, आता या निर्णयानंतर त्याचे काय परिणाम होऊ शकतील ते समोर आले आहेत.

प्रशासनाला ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठीचे स्ट्राँग रूम आणि मतमोजणी केंद्र २१ डिसेंबरपर्यंत राखीव ठेवावे लागतील.ही निवडणूक जवळपास २८० ठिकाणांवर होत असल्याने आणि प्रत्येकाची मतमोजणी स्वतंत्र ठिकाणी वेगवेगळ्या शहरात असल्याने जवळपास २८० पेक्षा जास्त मतमोजणी केंद्र आणि स्ट्राँग रूम २१ डिसेंबरपर्यंत राखीव ठेवावे लागेल.शिवाय सर्व स्ट्राँग रूममध्ये तेवढे दिवस ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठीचा पोलीस बंदोबस्त ठेवावा लागेल.स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम असताना निवडणूक निर्णय अधिकारी तसेच निवडणूक प्रक्रियेतील कर्मचाऱ्यांना रोज स्ट्राँग रूममध्ये जाऊन पाहणी करणे आणि स्वाक्षरी करणे बंधनकारक असते. ती प्रक्रिया रोज २१ डिसेंबरपर्यंत पार पाडावी लागेल.विधानसभेला साधारणपणे २८८ ठिकाणी मतमोजणी असते, जवळपास तेवढेच मतमोजणी ठिकाण नगर परिषद निवडणुकीत आहेत. मात्र, लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे विधानसभेची मतमोजणी वोटिंग नंतर लगेच एक किंवा दोन दिवसात होते. म्हणजे आज मतमोजणी समोर ढकलली गेली, तर विधानसभा निवडणूक सुमारे तीन आठवडे सांभाळावी एवढी प्रशासन आणि पोलिसांची यंत्रणा कामी लागेल.

# मला आणि धनंजय मुंडेंना सतत बहीण-भाऊ म्हणणं थांबवा!

## पंकजा मुंडे असं का म्हणाल्या?

बीड, (दिव्य न्युज):- राज्यात सध्या नगर परिषदा आणि नगर पंचायतीच्या निवडणुका पार पडत असताना, पर्यावरण मंत्री आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी आज बीड जिल्ह्यात विविध मतदान केंद्रांना भेट दिली. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या राजकीय नात्याबद्दल अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली. राजकारणातील त्यांच्या कामाच्या गांभीर्याकडे दुर्लक्ष करून केवळ बहीण-भाऊ म्हणून उल्लेख करणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.पंकजा मुंडे यांना पत्रकारांनी विचारले की, या निवडणुकीत 'तुम्हा बहिण-भावाचे पॅनेल' उतरले आहे, त्याबद्दल काय सांगाल? यावर त्यांनी प्रसारमाध्यमांना थेट सूचना केली की, आम्हाला बहीण-भाऊ म्हणणे बंद करा. आम्ही बहीण-भाऊ आहोत. मात्र, त्याआधी आम्ही गंभीर राजकारणी आहोत. धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आहेत, तर मी भारतीय जनता पक्षाची आहे. आम्ही २०-२२ वर्षे राजकारणात झोकून देऊन काम करत आहोत. आपापल्या पक्षाचे नेते आहोत.

# धनूभाऊ, तुमचा इंदौरमध्ये मर्डर झाला असता, पण भय्यूजी महाराजानी वाचवलेलं रत्नाकर गुट्टेंचा गौप्यस्फोट

परभणी , (दिव्य न्युज):- धनूभाऊ, तुमचा इंदौरमध्ये मर्डर झाला असता, पण दिवंगत भय्यूजी महाराज यांनी तुम्हाला वाचवलं, तुम्ही कोणत्या हॉटेलवर होतात, याची देखील मला माहिती आहे, असा खळबळजनक दावा गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांनी केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा प्रचार संपण्याच्या पूर्वसंध्येला गंगाखेड येथे आयोजित जाहीर सभेत रत्नाकर गुट्टे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सडकून टीका केली.

धनूभाऊ, तुमचा इंदौरमध्ये मर्डर झाला असता, पण भय्यूजी महाराज यांनी तुम्हाला वाचवलं, तुम्ही कोणत्या हॉटेलवर होतात हे देखील मला माहिती आहे, पण मी सगळेच आता काढणार नाही. तुम्ही सुरुवात केली आहे पण शेवट मी करणार आहे. तुम्ही मला २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत



पाडण्याचा प्रयत्न केला, तुम्ही माझ्या विरोधात कोणाकोणाला उमेदवारी दिली, त्यांच्यासाठी किती ताकद लावली, हे देखील मला माहित आहे. पण माझी गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील जनता हीच माझं बुलेटप्रूफ जॅकेट आहे, त्यामुळे माझा पराभव होऊ शकला नाही, मी प्रचंड मताधिक्याने विजयी झालो, असंही रत्नाकर गुट्टे म्हणाले.तुम्ही मला नीरव मोदी म्हणालात, पण तुम्ही तर विजय मल्ल्या आहात, कारण विजय मल्ल्याच्या आवडी आणि तुमच्या आवडीनिवडी एकच आहेत. तुम्ही गंगाखेडला आलात, मला तर परळीला यायला फक्त पंधरा मिनिटं लागतात, मी राजा आहे, मी कोणत्याही पक्षाच्या स्टेजवर जाऊ शकतो, मी त्या पक्षांच्या स्टेजवर जाईन पण धनु भाऊ तुमचा निकाल लावल्याशिवाय राहणार नाही, असे म्हणत आमदार रत्नाकर गुट्टे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा चांगला समाचार घेतला.

निवडणूक प्रचार संपण्याच्या पूर्वसंध्येला गंगाखेड येथे आयोजित जाहीर सभेत आमदार रत्नाकर गुट्टे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर कडाडून टीका केली. दोन दिवसापूर्वी धनंजय मुंडे हे गंगाखेड येथे आले होते आणि त्यांच्या बहीण आणि नगराध्यक्ष पदाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उर्मिला केंद्रे यांच्या प्रचारासाठी ते आले होते. त्यावेळी त्यांनी आमदार रत्नाकर गुट्टे यांच्यावर कडाडून टीका केली होती. आमदार गुट्टे यांनी शेतकऱ्यांच्या नावावर सोळाशे कोटी रुपयांचे कर्ज उचलले, ते नीरव मोदी असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या भाषणात म्हटले होते त्यांच्या या भाषणाचा समाचार आज आमदार रत्नाकर गुट्टे यांनी घेतला आहे.